**अनाथ मतीमंद मुला-मुलींच्या १० बालगृहातील प्रवेशितांची मान्य संख्या वाढविणे तसेच त्यापैकी ५ मतीमंद बालगृहाच्या १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कार्यशाळांना मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्र. इडीडी-२०१७/प्र.क्र.२४९/अ.क.१**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०२ मार्च, २०१९.

**वाचा:-** १) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.बालगृह २०११/प्र.क्र.३३८/कार्यासन-८, दि.३१.५.२०१२ व दि.१०.५.२०१३.

२) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इडीडी २००३/प्र.क्र.३४०/भाग-२/सुधार-२, दि.१८.८.२००४ व दि.३०.१.२००६.

३) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-४/मती/मती बालगृह/पदनिर्मिती प्रस्ताव /२०१३-१४/५०, दि.५.२.२०१४ व दि.१०.२.२०१५.

४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.इडीडी २०१३/प्र.क्र.२७६/अ.क.१, दि.३०.१.२०१४ व दि.२२ जून, २०१५.

५) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-४/मती/मती बालगृह, दि.२५.६.२०१८.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यात महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेली १४ अनुदानीत व ५ विना अनुदानीत अशी एकूण १९ मतीमंद मुला-मुलींची बालगृहे महिला व बाल विकास विभागाकडून दि.३०.५.२०१२ व दि.१०.५.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. राज्यातील कार्यरत १४ अनुदानीत मतीमंद बालगृहांमध्ये प्रवेशितांची क्षमता ९९० इतकी आहे. सदर मतीमंद बालगृहांना दि.२२.६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार कर्मचारीवृंद मंजूर करण्यात आलेला आहे. मात्र मोठया प्रमाणावर अनाथ, अपंग मतीमंद बालके जिल्हा बाल कल्याण समितीमार्फत सदर बालगृहामध्ये पाठविण्यात येतात. त्यामुळे सदर मतीमंद बालगृहामध्ये मान्य संख्येपेक्षा प्रवेशितांची संख्या जास्त आहे. तथापि त्याकरीता त्यांना कोणतेही वाढीव अनुदान अथवा पदे देण्यात येत नाहीत.

२. सदरची बालगृहे महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत कार्यान्वीत असतांना प्रवेशित मुलींच्या झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या कारणामुळे मुंबई मिररमध्ये प्रसिध्द झालेल्या वर्तमान पत्रातील बातमीची दखल घेऊन मा.उच्च न्यायालयाने स्वअधिकारात सुमोटो जनहित याचिका क्र.१८२/२०१० दाखल करुन घेतली आहे. सदरहू याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.७.४.२०१७ रोजी आदेश पारीत करुन सदर आदेशातील परि.क्र.६३(ए) ते (पीपी) अन्वये कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या दि.७.४.२०१७ च्या आदेशामधील ६३(बी) अन्वये राज्यामध्ये मतीमंद बालगृहांची पुरेशी संख्या उभारणे व त्यामध्ये आवश्यक त्या सोई-सुविधा पुरविणे ही राज्य शासनाची कायदेशीर व घटनात्मक जबाबदारी आहे असे मा.न्यायालयाने अभिमत व्यक्त करुन राज्यात आवश्यक असणा-या मतीमंद बालगृहांची संख्या राज्य समन्वय समितीच्या व तज्ञांच्या मदतीने निश्चित करावी व त्यावर शासनाने आदेशाच्या दिनांकापासून चार महिन्याच्या आत निर्णय घेऊन पुरेशी मतीमंद बालगृहे सुरु करण्याबाबत शक्य तितक्या लवकर निर्णय घ्यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने मा.प्रधान सचिव (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या

अहवालानुसार मतीमंद बालगृहांची संख्या निश्चित करुन त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तूर्तास स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या १० मतीमंद बालगृहांच्या प्रवेशितांची मान्य संख्या, त्यांच्याकडे पायाभूत सुविधा/ क्षमता असल्यामुळे वाढ करण्यात येईल व त्यामधील ५ मतीमंद बालगृहास १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कार्यशाळांना मान्यता देण्यात येईल असे मा.मुख्य सचिव यांचे स्तरावर मा.उच्च न्यायालयात शपथपत्र सादर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या १० मतीमंद बालगृहांच्या प्रवेशितांची मान्य संख्या, त्यांच्याकडे पायाभूत सुविधा/ क्षमता असल्यामुळे वाढ करणे व त्यामधील ५ मतीमंद बालगृहास १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कार्यशाळांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दि.२४.२.२०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आला असता, सदर प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

मा.मंत्रीमंडळाने दि.२४.२.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार सद्य:स्थितीत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या १० मतीमंद बालागृहांच्या प्रवेशितांची मान्य संख्या त्यांच्याकडे पायाभूत सुविधा/ क्षमता असल्यामुळे ४२० इतकी वाढ करणेबाबत आणि त्यापैकी ५ मतीमंद बालगृहास १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कार्यशाळांना पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) परिशिष्ट-अ मधील अनुदानीत मतीमंद बालगृह संलग्न १० विशेष शाळांची प्रवेशित विद्यार्थी क्षमता ४२० इतकी अनुदानीत तत्वावर वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) परिशिष्ट-ब मधील ५ मतीमंद बालगृह संलग्न कार्यशाळांना (विद्यार्थी क्षमता २००) अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

३) परिशिष्ट-क करीता दि.२२.६.२०१५ च्या शासन निर्णयातील आकृतीबंधानुसार अनुज्ञेय असणारी २०८ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. बालगृहनिहाय व कार्यशाळानिहाय मान्य पदांचा तपशील सोबत जोडला आहे. सदर पदमान्यतेस उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी.

४) वरील प्रयोजनार्थ येणा-या रु. ६९३.७१ लक्ष इतक्या वार्षिक आर्थिक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

५) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या उपरोक्त १० मतीमंद बलागृहांची आणि त्यापैकी ५ मतीमंद बालगृहास १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कर्मशाळांची मान्य विद्यार्थी संख्येत कोणताही बदल करता येणार नाही.

६) सदर बालगृहांना व कार्यशाळांना अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अन्वये सक्षम अधिकारी यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

७) मतीमंद बालगृहांमधील प्रवेशितांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारीत नियम २००६ अन्वये जिल्हा स्तरावर गठीत करण्यात आलेल्या बालकल्याण समितीने (सी डब्ल्यू सी) विहित केलेल्या प्रवेश प्रक्रियेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

८) बाल कल्याण समितीपुढे उक्त कायद्याखाली १८ वर्षाच्या आतील मतीमंद मुले दाखल झाल्यानंतर बाल हक्क समितीने परिविक्षा अधिकारी यांच्यामार्फत ते अनाथ असल्याची खात्री करावी. अनाथ व सकृतदर्शनी मतीमंद असल्याची खात्री झाल्यानंतर त्यांची तात्पुरती व्यवस्था महिला व बाल विकास

नियंत्रणाखालील इतर संस्थेमध्ये करावी. अशा आश्रीतांचे अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अन्वये अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याकरीता गठीत केलेल्या निकटतम तज्ञ वैद्यकिय महामंडळाकडून अपंगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. मतीमंद असल्याचे तज्ञ वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधीत जिल्हयातील मतीमंद बालगृहातील रिक्त जागांची माहिती घेऊन संबंधीत निकटतम मतीमंद बालगृहामध्ये संबंधीत आश्रीतांस प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे संबंधीत आश्रीतांस सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील मतीमंदाच्या निवासी विशेष शाळा किंवा कर्मशाळांमध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद / सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/ उपनगर यांच्या समन्वयाने प्रवेश देणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील.

९) मतीमंद बालगृहांमध्ये बालकल्याण समितीच्या आदेशाप्रमाणे प्रवेश दिल्यानंतर संस्था प्रमुखास बाल कल्याण समितीच्या पूर्वपरवानगी शिवाय सदरहू आश्रीतांचा प्रवेश रद्द करणे, संस्थेतून मुक्त करणे अथवा एका संस्थेतून दुस-या संस्थेमध्ये हस्तांतरीत करता येणार नाही.

१०) वय वर्षे १८ च्या खालील मतीमंद मुलांना मतीमंद बालगृहामध्ये दाखल केल्यानंतर त्यांचे शारीरिक वय १८ वर्षापेक्षा अधिक झाले असले तरी त्याचे बौधिक वय वाढत नसल्यास ही मुले अनाथ मतीमंद आश्रीत असल्यामुळे त्यांची आजीवन किंवा पर्यायी सुविधा होईपर्यतच्या कालावधीकरीता त्याच मतीमंद बालगृहामध्ये व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

११) ज्या मतीमंद बालगृहामध्ये मुले आणि मुली एकत्रित आहेत अशा मतीमंद बालगृहामध्ये मुला मुलींची निवास व्यवस्था स्वतंत्र करणे व मुलींच्या निवासी कक्षामध्ये महिला काळजीवाहकाची नियुक्ती करणे बंधनकारक राहील.

१२) मतीमंद बालगृहाकरीता शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण तसेच सुश्रूषा व काळजीकरीता आवश्यक तो प्रशिक्षीत कर्मचारी, विशेष तज्ञ व सेवक वर्ग मानकाप्रमाणे ठेवणे मतीमंद बालगृह चालविणा-या संस्थेवर बंधनकारक राहील. आश्रीतांची नियमित वैद्यकिय तपासणी करुन पुरविण्यात आलेल्या वैद्यकिय उपचाराचे अभिलेख ठेवणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१३) मतीमंद बालगृहे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारीत नियम २००६ व अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५ या दोन्ही कायद्यांतर्गत कार्यान्वीत असल्यामुळे राज्य स्तरावर आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे व आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची तसेच जिल्हा स्तरावर संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ उपनगर व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांची सदरील बालगृहावरील नियंत्रणाबाबत संयुक्तीक जबाबदारी राहील.

१४) मतीमंद बालगृहांचे मूल्यनिर्धारण संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ उपनगर यांचेमार्फत प्रतिवर्षी संस्थेचे सनदी लेखापालांच्या लेखा परीक्षण अहवालाप्रमाणे व संस्थेने ठेवलेल्या अभिलेख्यावरुन करण्यात येईल.

१५) मतीमंद बालगृहामध्ये अपंगांच्या शाळा किंवा कार्यशाळा संहिता १९९७ व २०१८ व नोंदणी प्रमाणपत्रासाठीची मानकाप्रमाणे सोईसुविधा उपलब्ध करुन देणे संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच दिव्यांग हक्क अधिनियममधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१६) संबंधीत बालगृहांमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडल्यास अथवा कोणत्याही स्वरुपाची अनियमितता घडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत संस्था व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांना व्यक्तीगत व संयुक्तरित्या जबाबदार धरुन प्रचलित कायद्याप्रमाणे कारवाईस पात्र राहतील.

१७) सदर बालगृहास बालगृह संलग्न अपंगाच्या (मतीमंदाची) विशेष शाळा/कर्मशाळा असे संबोधण्यात येईल.

१८) सदर बालगृहे बाराही महिने कार्यरत असल्याने उन्हाळी किंवा हिवाळी तसेच इतर सुट्टयामध्ये शिक्षकेत्तर कर्मचा-यांची जबाबदारी राहील, तशीच ती शिक्षकांचीही राहील.

१९) मतीमंद बालगृहांशी संलग्न अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांना केंद्र सरकार/ स्थानिक संस्थांकडून किंवा इतर माध्यमांकडून नियमीत अनुदान मिळत आहे, असे निदर्शनास आल्यास अशा मतीमंद बालगृह संलग्न अपंग शाळा/ कर्मशाळा राज्य शासनाची अनुदान मिळण्यास अपात्र ठरतील.

२०) शासनाने अनुदान तत्वावर आणणेकरीता वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती आणि कार्यपध्दतीचे पालन झालेले नाही, असे आढळून आल्यास त्या संस्थेची मान्यता रद्द करण्यात यईल.

३. सदरहू स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या १० मतीमंद बलागृहांच्या प्रवेशितांची मान्य संख्या त्यांच्याकडे पायाभूत सुविधा/ क्षमता असल्यामुळे वाढ करणेबाबत आणि त्यापैकी ५ मतीमंद बालगृहास १८ वर्षावरील मुला-मुलींकरीता संलग्न कार्यशाळांना अनुदान मंजूर करण्याबाबतचे आदेश राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०२१२५८२७९४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: CN = Dnyandev Laxman Sul, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice Department
Date: 2019.03.02 13:05:36 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा.मंत्री (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद), विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
४) मा.राज्यमंत्री, (सामाजिक न्याय),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई४०० ०३२.
५) प्रधान सचिव (सामाजिक न्याय), यांचे स्वीय सहायक, मुंबई ४०० ०३२.
६) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.
८) सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग.
९) सर्व समाज कल्याण अधिकारी.

१०) महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
११) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषाधिकारी.
१३) निवडनस्ती / संग्रह नस्ती (अपंग कल्याण -१).

*****

## परिशिष्ट-अ

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | ज्ञानदेव शिक्षण प्रसारक मंडळ, कदेर संचलित तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह (क/व) एकुरगावाडी, जि. उस्मानाबाद | कै. बापूसाहेब एन. झेड मराठे विधायक संस्था, शिरपूर, जि. धुळे संचलित मतिमंद मुला-मुलींचे बालगृह, शिरपूर, जि. धुळे | श्री. हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित मतिमंद बालगृह, सोलापूर | मतिमंद युवक विकास व प्रशिक्षण संस्था मतिमंद बालगृह गोल्हर काचुरवाही, ता. रामटेक, जि. नागपूर | परमप्रसाद चॅरिटेबल सोसायटी, सातारा संचलित शासकीय मतिमंद मुलांचे संमत केंद्र, सातारा | मुक्ताई मतिमंद मुलांचे बालगृह, लवंगी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | नवोदय ग्रामिण नागरी विकास प्रतिष्ठाण व सांस्कृतिक मंडळ, पाथर्डी, जि. अहमदनगर संचलित मतिमंद बालगृह ता. पाथर्डी, जि. अहमदनगर | यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे संचलित श्री. संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह, धुळे | तुळजाई प्रतिष्ठाण बहु. संस्था, पानगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद संचलित स्व. आधार मतिमंद मुलींचे बालगृह, विमानतळ रोड, आळणी, ता.जि. उस्मानाबाद | श्री. गजानन बहु संस्था, बोरी, ता. जि. लातूर संचलित संत गाडगेबाबा मतिमंद बालगृह, लातूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | |
| अ | वाढीव विद्यार्थी संख्या | ३० | ५० | ३० | ५० | ५० | ३० | ५० | ५० | ३० | ५० | ४२० |
| ब | अनुज्ञेय पदे | | | | | | | | | | | |
| १ | मुख्याध्यापक वरिष्ठ स्तर | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १० |
| २ | विशेष शिक्षक | ४ | ६ | ४ | ६ | ६ | ४ | ६ | ६ | ४ | ६ | ५२ |
| ३ | कला /संगित/हस्त व्यवसाय/ शारीरिक शिक्षक | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | २ | १ | २ | १६ |
| ४ | निम वैद्यकिय अधिकारी | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | काळजीवाहक | ३ | ५ | ३ | ५ | ५ | ३ | ५ | ५ | ३ | ५ | ४२ |
| ६ | सफाईगार | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १० |
| ७ | मानद वैद्यकिय अधिकारी | - | | - | | | - | | | - | | - |
| | एकूण ब | १० | १५ | १० | १५ | १५ | १० | १५ | १५ | १० | १५ | १३० |

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: CN = Dnyandev Laxman Sul, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice Department
Date: 2019.03.02 13:05:54 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट-ब

| अ.क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | कै. बापूसाहेब एन. झेड मराठे विधायक संस्था, शिरपूर, जि. धुळे संचलित मतिमंद मुला-मुलींचे बालगृह, शिरपूर, जि. धुळे | परमप्रसाद चॅरिटेबल सोसायटी, सातारा संचलित शासकीय मतिमंद मुलांचे संमत केंद्र, सातारा | मुक्ताई मतिमंद मुलांचे बालगृह, लवंगी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ, धुळे संचलित श्री. संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह, धुळे | तुळजाई प्रतिष्ठाण बहु. संस्था, पानगांव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद संचलित स्व. आधार मतिमंद मुलींचे बालगृह, विमानतळ रोड, आळणी, ता.जि.उस्मानाबाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ५ | ६ | |
| अ | वाढीव विद्यार्थी संख्या | २५ | १०० | २५ | २५ | २५ | २०० |
| ब | अनुज्ञेय पदे | | | | | | |
| १ | कार्यशाळा व्यवस्थापक/ व्यवसाय अधिक्षक | १ | १ | १ | १ | १ | ५ |
| २ | निदेशक | २ | ८ | २ | २ | २ | १६ |
| ३ | लेखापाल | - | १ | - | - | - | १ |
| ४ | लिपीक नि लेखापाल | - | १ | - | - | - | १ |
| ५ | मानद वैद्यकिय अधिकारी | १ | १ | १ | १ | १ | ५ |
| ६ | गृहपाल | १ | १ | १ | १ | १ | ५ |
| ७ | स्वयंपाकी | २ | २ | २ | २ | २ | १० |
| ८ | काळजीवाहक | २ | ७ | २ | २ | २ | १५ |
| ९ | मदतनीस | १ | ४ | १ | १ | १ | ८ |
| १० | सफाईगार | १ | १ | १ | १ | १ | ५ |
| ११ | पहारेकरी | १ | १ | १ | १ | १ | ५ |
| १२ | वाहन चालक | - | १ | - | - | - | १ |
| १३ | वाहन परिचर | - | १ | - | - | - | १ |
| | एकूण ब | १२ | ३० | १२ | १२ | १२ | ७८ |

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: CN = Dnyandev Laxman Sul, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice Department
Date: 2019.03.02 13:06:52 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट-क

| | | |
|---|---|---|
| **अ- बालगृहातील शिक्षक शिक्षकेत्तर वाढणारी पदे** | | |
| १ | मुख्याध्यापक | १० |
| २ | विशेष शिक्षक | ५२ |
| ३ | शारीरिक शिक्षक निदेशक/कला हस्त व्यवसाय | १६ |
| ४ | काळजीवाहक | ४२ |
| ५ | सफाईगार | १० |
| | **एकूण अ** | १३० |
| **ि‍ब- कार्यशाळांकरीता अनुज्ञेय पदे** | | |
| १ | कार्यशाळा व्यवस्थापक | ५ |
| २ | निदेशक | १६ |
| ३ | लेखापाल | १ |
| ४ | लिपीक नि लेखापाल | १ |
| ५ | मानद वैद्यकिय अधिकारी | १ |
| ६ | गृहपाल | ५ |
| ७ | स्वयंपाकी | ६ |
| ८ | काळजीवाहक | १५ |
| ९ | मदतनीस | १२ |
| १० | सफाईगार | ५ |
| ११ | वाहन चालक | ५ |
| १२ | पहारेकरी | ५ |
| १३ | वाहन परिचर | १ |
| | **एकूण ब** | ७८ |
| | **एकूण अ +ब** | २०८ |

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: CN = Dnyandev Laxman Sul, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice Department
Date: 2019.03.02 13:07:07 +05'30'

**( ज्ञा. ल. सुळ )**

सह सचिव, महाराष्ट्र शासन